तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

२५६५६२३४ **Email : ropune@dtemaharashtra.gov.in**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी /२०१९/ 4878 दिनांक : 29 NOV 2019

प्रति
संचालक / प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसायीक
अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसाईक अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायाद्या पडताळणीबाबत....

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/प्र.या पडताळणी/२०१९/७१५ दिनांक ०९/०९/२०१९.
२. या कार्यालायचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी/२०१९/४७०० दिनांक १६/११/२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्र क्र २ व्दारे आपणास शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायादी मधील त्रुटी पडताळणी करण्यासाठी या कार्यालयात उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापी आज तागायत ब-याच संस्था या कार्यालयात गुणवत्तायादी मधील त्रुटी पडताळणी करण्यासाठी उपस्थित राहील्या नाहीत. त्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की त्यांनी त्रुटी पडताळणीची कार्यवाही दिनांक ०३/१२/२०१९ पर्यत पूर्ण करावी.

मा प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या सुचनेनुसार **Safalta** या वेब पोर्टलवर संस्थांनी अपूर्ण कागदपत्रांची पुर्तता ऑन लाईन करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. संस्थांनी ऑन लाईन कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर आपल्या संस्थेमधील अर्ज विभागीय कार्यालयाच्या लॉग ईन मध्ये पडताळणी करण्यासाठी प्राप्त होत आहेत. ज्या संस्थां उपरोक्त दिलेल्या कालावधीत त्रुटी पूर्तता या कार्यालयाकडून करुन घेणार नाहीत अशा संस्थांचे **Safalta** वेबपोर्टलवर प्राप्त झालेले अर्ज पडताळणी करुन पुढे पाठविले जाणार नाहीत व सदर पडताळणी न केल्याने आपल्या संस्थेची प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्तायादी प्रलंबीत राहील्यास याची सर्वस्वी जबादारी हि संस्थाप्रमुखांची राहील याची आपण नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्या संस्थांची ई बी सी चे उपयोगिता प्रमाणपत्रा सादर न केल्याने गुणवत्तायाद्या प्रलंबीत आहेत अशा सर्व संस्थांनी प्रलंबीत ई बी सी चे उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ सादर करुन गुणवत्तायादी या कार्यालयाकडून विहीत मुदतीत पडताळणी करुन घ्यावी. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायाद्या प्रलंबीत राहील्यास व सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशास प्रवेश नियामक प्राधिकरण यांची मान्यता प्राप्त न झाल्यास याची सर्वस्वी जबाबादारी संस्थाप्रमुखांची राहील याची आपण नोंद घ्यावी.

प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.